# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,

एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३


जा.क्र.मका/कार्य/२०१४-१५/१०६९ दिनांक :१९/९/१४

## परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित आस्थापनांमध्ये कार्यरत कामगारांच्या पाल्यांना वाहन चालकाचे प्रशिक्षण मिळणेबाबत.**

---

**अल्प उत्पन्न गटातील कामगारांच्या पाल्यांकरीता विशेष मोहिम.**

**संदर्भ :-** मका/सचिव/१७५ दि.३०/०८/२०१४

उपरोक्त विषयाला अनुसरुन सर्व सहायक कल्याण आयुक्त, कामगार कल्याण अधिकारी व केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, मंडळाच्या दिनांक १९/८/२०१४ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार व वरील संदर्भीय पत्रानुसार मारुती सुझुकी इंडिया लि. या संस्थेमार्फत राज्यातील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित आस्थापनेमधील कामगारांच्या पाल्यांसाठी वाहन चालकाचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. कामगार कुटुंबिय पाल्यांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने सदरचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येणार आहेत.

सदरचे प्रशिक्षण वर्ग प्रथम टप्प्यात **अल्प उत्पन्न गटातील कामगारांच्या पाल्यांकरीता विशेष मोहिमेतंर्गत** शहरी भागातील कामगार कुंटूबाचे वार्षिक उत्पन्न रु.१,०३,०००/- पर्यंत व ग्रामीण भागातील कामगार कुंटूबाचे वार्षिक उत्पन्न रु.८१,०००/- पर्यंत असणाऱ्या कामगार कुंटूबीय पाल्याकरिता सुरु करण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रशिक्षण वर्ग राज्यातील १८ गट कार्यालयाच्या स्तरावर सुरु करण्यात येणार आहेत. सदरचे प्रशिक्षण वर्गाची पहिली बॅच **माहे ऑक्टोबर, २०१४** पासून सुरु करण्यात येणार आहे.

### -:प्रशिक्षण वर्ग नियम व अटी:-

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १. | प्रशिक्षणार्थींचे वय कमीत कमी १८ ते जास्तीत जास्त ३० वर्ष असावे. वयाच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा. |
| २. | सदरच्या प्रशिक्षणामध्ये कामगारांच्या पाल्यांना शिक्षणाची अट इयत्ता ८ वी ते १२ वी राहिल. |
| ३. | अर्जदारास कोणत्याही प्रकारे अंपगत्व नसावे. तसेच कोणताही दृष्टीदोष व कर्णदोष नसावा यासाठी अर्जदाराने प्रवेश अर्जात उल्लेख करावा. |
| ४. | प्रशिक्षणार्थी हा शारिरीक दृष्टया सक्षम असावा. |
| ५. | शहरी भागातील कामगार **कुंटूबाचे वार्षिक उत्पन्न रु.१,०३,०००/-** पर्यंत व ग्रामीण भागातील कामगार **कुंटूबाचे वार्षिक उत्पन्न रु.८१,०००/-** पर्यंत असणे आवश्यक आहे. अर्जासोबत कुटुंबाचा वार्षिक उत्पन्नाचा सक्षम अधिका-यांचा दाखला जोडावा. |
| ६. | सदर प्रशिक्षणाचा एका कुंटूबातील एकाच सभासदास लाभ देण्यात येईल. |
| ७. | मंडळाच्या या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थीकडून सरसकट रु.५००/- एवढे माफक शुल्क आकारण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ८. | प्रशिक्षणार्थींना कामगार कल्याण केंद्राचे सर्वसाधारण सभासद नोंदविण्यात यावे. |
| ९. | वाहन चालकाचे प्रशिक्षण हे २१ दिवसाचे रोज १ तास असेल. |
| १०. | प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीला शिकाऊ वाहन चालक परवाना मिळेल. त्यानंतर त्यांना स्व खर्चाने कायम वाहन चालक परवाना प्राप्त करावा लागेल. |
| ११. | प्रवेश नोंदणी करताना प्रशिक्षणार्थींकडून प्रवेश अर्ज भरुन घेण्यात यावा. अर्जासोबत २ पासपोर्ट साईज फोटो, ओळखपत्र (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र) वयाच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला,रहिवाशी पुराव्यासाठी रेशन कार्ड / लाईट बील / सक्षम अधिका-यांचा रहिवासी दाखला, पालकांची चालू वर्षाची माहे जुन / डिसेंबर कामगार कल्याण निधी कपात उल्लेख असलेली वेतन पावती सोबत जोडावी. कुटुंबाचा वार्षिक उत्पन्नाचा सक्षम अधिका-यांचा दाखला जोडावा. |
| १२. | प्रशिक्षण वर्गासाठी एका बॅचमध्ये २५ प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात यावा. |
| १३. | प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर म.का.क.मंडळ व मारुती सुझुकी यांचे संयुक्त विद्यमाने प्रमाणपत्र दिले जाईल. |

सर्व विभाग व गट प्रमुखांनी वरील नियम व अटी प्रमाणे सभासदांची नोंदणी करुन यादी खालील तपशिलाप्रमाणे या कार्यालयास दिनांक ३०/९/२०१४ पर्यंत विनाविलंब सादर करावी.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | पत्ता | वय | शिक्षण | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई
२) लेखा परिक्षा / लेखा अधिकारी, म.का.मुंबई
३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम / भांडार शाखा म.का.मुंबई
४) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, म.का. मुंबई
५) विधी अधिकारी, म.का.मुंबई
६) सहायक कल्याण आयुक्त, वि.का.मुंबई/ठाणे/पुणे /नाशिक/नागपूर/का.क्रीडा भवन, मुंबई
७) प्र. सहायक कल्याण आयुक्त, वि.का.औरंगाबाद / अकोला
८) सर्व सहायक लेखा अधिकारी ७ विभागीय कार्यालये
९) सर्व कामगार कल्याण अधिकारी १८ गट कार्यालये ★★★
१०) सर्व केंद्र प्रमुख

★★★ यांनी सदरचे परीपत्रक आपल्या गटांतर्गत केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/२४३६०७३८


जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१४-१५/३०४९ दिनांक:- २९/११/२०१४.

## <u>परिपत्रक</u>

<u>विषय</u>:- महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित आस्थापनांमध्ये कार्यरत कामगारांच्या पाल्यांना वाहन चालकाचे प्रशिक्षण मिळणेबाबत.
<u>अल्प उत्पन्न गटातील कामगारांच्या पाल्यांकरीता विशेष मोहिम</u> .

संदर्भ:- मका/कार्यक्रम/१४-१५/१०६९दि.१९/०९/१४.

उपरोक्त विषयाला अनुसरुन सर्व सहायक कल्याण आयुक्त, कामगार कल्याण अधिकारी व केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय परिपत्रकान्वये मारुती सुझुकी इंडिया प्रा.लि. या संस्थेमार्फत राज्यातील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित आस्थापनेमधील कामगारांच्या पाल्यांसाठी वाहन चालकाचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदरच्या परिपत्रकातील प्रशिक्षण वर्गाच्या नियम व अटींमध्ये शिक्षणाची अट इयत्ता ८ वी ते १२ वी अशी निश्चित करण्यात आली होती त्याऐवजी शिक्षणाची अट विशेष बाब म्हणून इयत्ता ८ वी ते पदवी अशी निश्चित करण्यात येत आहे याची नोंद घेऊन कार्यवाही करावी.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई
२) लेखा परिक्षा / लेखा अधिकारी, म.का.मुंबई
३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम / भांडार शाखा, म.का.मुंबई
४) प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी, म.का.मुंबई
५) विधी अधिकारी, म.का.मुंबई
६) सहायक कल्याण आयुक्त, वि.का.मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/नागपूर/का.क.भवन,मुंबई
७) प्र.सहायक कल्याण आयुक्त, वि.का.औरंगाबाद / अकोला
८) सर्व सहायक लेखा अधिकारी ७ विभागीय कार्यालये
९) सर्व कामगार कल्याण अधिकारी, १८ गट कार्यालये ★★★
१०) सर्व केंद्र प्रमुख

★★★ यांनी सदरचे परिपत्रक आपल्या गटांतर्गत केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,

**एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३**

दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/२४३६०७३८


जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१५-१६/ ११८० दिनांक:- २० /०८/२०१५.

## परिपत्रक

विषय:- **महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित आस्थापनांमध्ये कार्यरत कामगारांना व कामगारांच्या पाल्यांना वाहन चालकाचे प्रशिक्षण मिळणेबाबत.**

संदर्भ:- १) मका/कार्यक्रम/१४-१५/१०६१दि.११/०९/२०१४.

२) मका/कार्यक्रम/१४-१५/३०४१दि.२१/११/२०१४.

३) मका/कार्यक्रम/१४-१५/११दि.०५/०१/२०१५.

४) मका/कार्यक्रम/१४-१५/२५१दि.०३/०३/२०१५.

५) दिनांक ०७.०८.२०१५ रोजीच्या अधिकारी कार्यशाळेतील निर्णय

उपरोक्त विषयाला अनुसरुन सर्व सहायक कल्याण आयुक्त, कामगार कल्याण अधिकारी व केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय १ च्या परिपत्रकान्वये मारुती सुझुकी इंडिया प्रा.लि. या संस्थेमार्फत राज्यातील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित आस्थापनेमधील कामगारांच्या पाल्यांसाठी वाहन चालकाचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे नियम व अटी मध्ये बदल करण्यात येत आहे.

१.प्रशिक्षणार्थीचे वय जास्तीत-जास्त ३० वर्षे ऐवजी ३५ वर्षे असावे.

२. कामगार कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा कामगार पाल्यासाठी रु.१,८०,०००/- ऐवजी रु.३,००,०००/- व कामगारासाठी रु.२,५०,०००/- पर्यन्त वाढविण्यात येत आहे.

३. शासनाच्या परिवहन विभागाच्या संगणकीय प्रणालीव्दारे शिकावू परवाना मिळण्यास विलंब होत असल्यामुळे प्रशिक्षण वर्गातील एका बॅचमध्ये २५ प्रशिक्षणार्थी ऐवजी कमीत-कमी ५ प्रशिक्षणार्थीची बॅच असावी.

तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन कार्यवाही करावी. सदरचे परिपत्रक दिनांक २० ऑगस्ट २०१५ पासून आमलात राहील.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई

२) लेखा परिक्षा / लेखा अधिकारी, म.का.मुंबई

३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम / भांडार शाखा, म.का.मुंबई

४) प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी, म.का.मुंबई

५) सहायक कल्याण आयुक्त, वि.का.मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/नागपूर/अकोला/का.क.भवन,मुंबई

६) प्र.सहायक कल्याण आयुक्त, वि.का.औरंगाबाद

७) कामगार विकास अधिकारी,कामगार कल्याण भवन,नागपूर/पुणे

८) सर्व सहायक लेखा अधिकारी ७ विभागीय कार्यालये

९) सर्व कामगार कल्याण अधिकारी, १८ गट कार्यालये ★★★

१०) सर्व केंद्र प्रमुख

★★★ यांनी सदरचे परिपत्रक आपल्या गटांतर्गत केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.